स्वतःकडे परकेपणाने पाहून
स्वतःला न्याहाळलं आहे कधी?
दुरून पाहून, जवळचे मानून
स्वतःला जोडून घेतलंत कधी?

आपण आपल्यातच असतो,
आपण आपल्याला ओळखतो,
असेच नेहमी म्हणता, पण,
आपलाच सन्मान करता कधी?

आम्ही आमच्यासाठीच जगतो,
त्यासाठीच दिवस-रात्र झटतो,
कष्ट-पैसा-चिंता यात मग्न; पण,
काय हवं मनाला विचारलंत कधी?

मनाला हवीय शांतता नि सुंदरता
प्रफुल्लता नि जीवनाची अर्थगर्भता
मनाला हवीय कदर जागत्या मनाची
जवळीक हवीय स्वतःवरील प्रेमाची

२५.१.२०१९